ISSN No 2455-3948
www.deasra.in
de Asra 'दे आसरा फाउंडेशन'चे मासिक

# यशस्वी उद्योजक™

वर्ष ६ | अंक ०८ | सप्टेंबर २०२० | पाने ८३ | किंमत रु.७०/-

## सदरं

मनोवेध
डॉ. राजेंद्र बर्वे

अनुभवाचे बोल
एस. आर. जोशी

कहाणी उद्योगपटांची
सुहास किर्लोस्कर

उद्योगसेतू
साहिल शेणई

अर्थभान
निखिल केंजळे


परत मातृभूमीला...
ज्योत्स्ना नाईक

## विशेष विभाग:
## पाळीव प्राण्यांचे व्यवसाय



०८
स्वरदा जोशी
पाळीव प्राण्यांच्या व्यवसायातल्या उद्योगसंधी

२८
मीरा ठोसर
उद्योग कुत्र्यांच्या प्रशिक्षणाचा



२२
सुजित रेमभोटकर
सुहास रेमभोटकर
मत्स्यालयाचा किफायतशीर व्यवसाय



४२
ब्रँडेड गोष्टी
प्राणीखाद्याचा बहुराष्ट्रीय ब्रँड
सुधीर जोगळेकर



१४
शलाका मुंदडा
पेटसीटर्स: कुत्र्यांना घरपण देणारं पाळणाघर



३४
सोनल झलकीकर
पेटफिस्ट इंडिया
पाळीव प्राण्यांच्या खाऊचा व्यवसाय



३८
मॅक्सवेल
पाळीव प्राण्यांसाठी सारं काही

सेवाक्षेत्रातल्या उद्योगांच्या बाबतीत आपलेपणा, जिव्हाळा या गोष्टी प्रशिक्षण, भांडवल या गोष्टींइतक्याच महत्त्वाच्या ठरतात. त्यातून हा उद्योग पाळीव प्राण्यांच्या संदर्भात असेल तर त्यांची भाषा समजून घेत संयमाने त्यांना हाताळावं लागतं. या क्षेत्रात जीव ओतून काम केलं तर असे उद्योग पैशांपेक्षा कितीतरी पट अधिक कामाचं समाधान रोजच्या दिवसाला देतात. समर्पित वृत्तीने प्रत्येक कुत्र्याला स्वतंत्र केनेलमध्ये मायेने सांभाळणाऱ्या शलाका मुंदडा आणि त्यांच्या 'पेटसीटर्स'विषयी जाणून घेऊया...

## पेटसीटर्स

# कुत्र्यांना घरपण देणारं पाळणाघर



शलाका मुंदडा

## वृषाली जोगळेकर
vrushali.joglekar@uniquefeatures.in




'युनिक फीचर्स'मध्ये कार्यरत असून उद्योजकता विकासासह विविध विषयांवर लेखन करतात

**फार वर्षं झाली या गोष्टीला आता.** आमच्या परिचितांपैकी एकांकडे कुत्रा पाळलेला होता. त्यांना ३-४ दिवस बाहेरगावी जायचं होतं. तेवढे दिवस कुत्रा सांभाळण्याची जबाबदारी आमच्याकडे होती. त्यांना विचारुन त्याचं जेवण वगैरे आम्ही सांभाळत होतो. दिवसभर तो कुत्रा बाहेर अंगणातच असे. पण त्या कुत्र्याला एक सवय होती. रात्री तो घरातच बेडखाली झोपत असे. कुत्रं पाळण्याचा आमचा अनुभव तोवर शून्य होता. त्यामुळे त्याच्या या सवयीचं काय करायचं हा मोठाच प्रश्न उभा राहिला. कसातरी आम्ही तो तेव्हा सोडवला. शलाका मुंदडा यांना भेटल्यावर आणि त्यांचं पेटसीटर्स बघितल्यावर हा प्रसंग मला प्रकर्षाने आठवला. त्यावेळी शलाकाताई भेटल्या असत्या तर हा प्रश्न चुटकीसरशी सुटला असता. शलाकाताई आता हजारो लोकांचे असे प्रश्न सोडवत आहेत. काय करतात त्या नेमकं हे समजून घेणं अतिशय रोचक, रंजक आणि तितकंच प्रेरणादायी आहे. त्यांची ही कहाणी समजून घ्यायची तर शलाकाताईंच्या भूतकाळात थोडंसं डोकवायला लागेल.

सर्वसाधारणपणे सुशिक्षित, सुसंस्कारीत कुटुंबांमध्ये होतं तसंच शलाकाताई यांच्या बाबतीतही झालं. एम.बी.ए. ही व्यवस्थापनातली पदवी घेतल्यानंतर शलाकाताईंनी काही वर्षं एका नामवंत बँकेत चांगल्या पदावर नोकरी केली तर काही वर्ष माहिती तंत्रज्ञान या क्षेत्रातही काम केलं. पण काही कारणाने दोन्ही कामांमधून त्या मोकळ्या झाल्या. याच दरम्यान कधी तरी त्यांच्या घरी असलेल्या कुत्र्याच्या उपचारांसाठी डॉ. मिलिंद हाटेकर या व्हेटर्नरी डॉक्टरांकडे त्यांना वारंवार जावं लागत होतं. कुत्र्यांबद्दल मनात आपुलकी, प्रेम होतं. हाताशी वेळ होता. डॉ. हाटेकरांना मदत करायला शलाकाताई यांनी सुरुवात केली. ट्रीटमेंटसाठी येणाऱ्या प्रत्येक कुत्र्याची समस्या वेगळी असायची. त्याच्या मालकांच्या अपेक्षा वेगवेगळ्या असायच्या. वैद्यकीय उपचारांबरोबरच बीहेवीयरल थेरपीचीही गरज असायची. हे सगळं शलाकाताई जवळून बघत होत्या, अनुभवत होत्या. जवळपास वर्षभर त्यांचं हे काम चालू होतं. याच काळात कुत्र्यांसाठी काही तरी करायचं हे त्यांच्या मनानं पक्कं केलं. पण काही तरी म्हणजे नेमकं काय हे ठरवायला हवं होतं.

डॉक्टरांकडे काम करत असताना एक निरीक्षण त्यांनी नोंदवलं होतं. दिवाळीच्या आणि उन्हाळ्याच्या सुट्ट्या झाल्या की बरीचशी कुत्री आजारी पडतात किंवा चिडचिडी होतात. त्याचं कारण म्हणजे या सुट्ट्यांमध्ये कुत्र्यांचे मालक सहलीसाठी फिरायला जातात. कुत्र्याची जबाबदारी नातेवाईकांकडे अथवा ओळखीच्यांकडे सोपवली जाते. ही जबाबदारी ती मंडळी कितीही मनापासून पार पाडत असली तरी त्यांना त्या कुत्र्यांची, त्यांना सांभाळण्याची तितकीशी माहिती असतेच असं नाही. त्यामुळे त्यात थोडीफार हलगर्जी होण्याची शक्यता असते. याचा परिणाम म्हणजे कुत्रं आजारी तरी पडतं, त्याचं वजन तरी कमी होतं नाही तर त्याच्या वागणुकीत काही तरी बदल दिसायला लागतो. तोपर्यंत तरी पुण्यात कुत्र्यांना आपलेपणाने सांभाळणारी अशी काही प्रोफेशनल संस्था नव्हती. शलाकाताईंनी हे नेमकेपणाने हेरलं आणि पेटसीटर्स या कुत्र्यांना पाळणाघरासारखं सांभाळणाऱ्या संस्थेचा जन्म झाला. ते वर्ष होतं २००८. इथे एक गोष्ट आवर्जून सांगायला हवी, शलाकाताईंना कुत्र्यांची आवड असली तरी त्यांच्या माहेरी कुत्रा पाळलेला नव्हता. लग्न झाल्यानंतर सासरी कुत्रा असल्यामुळे त्यांची







ती आवड पूर्ण झाली. थोडक्यात कुत्र्यांबरोबरचा त्यांचा सहवास दीर्घ काळ नव्हता.

पेटसीटर्स चालू करण्याचा हा निर्णय घेणं अर्थात तितकंसं सोपं नव्हतं. आवड म्हणून घरातल्या एक-दोन कुत्र्यांना सांभाळणं आणि व्यवसाय म्हणून एकाच वेळी अनेक कुत्र्यांना सांभाळणं हे मानसिक आणि शारीरिक दृष्ट्यासुद्धा बऱ्यापैकी थकवणारं काम आहे. पुन्हा ते काही तात्पुरतं किंवा मर्यादित वेळेत करायचं काम नाही. अक्षरश: चोवीस तासांची बांधीलकी या व्यवसायासाठी आवश्यक आहे. शिवाय या व्यवसायासाठी तोपर्यंत तरी कुठलीही मळलेली वाट नव्हती, दिशा दाखवणारं कोणी नव्हतं. नेमकं काय आणि कसं करायचं हे सगळं स्वत:लाच ठरवायचं होतं. अशा सगळ्या प्रतिकूल वाटणाऱ्या गोष्टींमध्ये दिलासा देणारी महत्त्वाची गोष्ट होती ती शलाकाताईंचा स्वत:वरचा दृढ विश्वास. आणि त्याला तितकीच समर्थ आणि भरभक्कम साथ मिळाली ती त्यांच्या माहेर आणि सासरच्या जवळच्या माणसांकडून.

शलाकाताईंच्या वडिलांची हिंजवडीच्या जवळ असलेल्या माण या गावात जमीन होती. तिथेच त्यांचं घरही होतं. ही जागा त्यांनी पेटसीटर्ससाठी देऊ केली. प्रत्येक कुत्र्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करायची हे शलाका यांनी ठरवलेलं असल्यामुळे त्यांना या प्रशस्त जागेचा फायदाच झाला. त्यांचे पती आणि वडील दोघंही इंजिनिअर आणि पती तर बांधकाम व्यावसायिकही असल्याने जागेवर बांधकाम करताना त्यांच्या अनुभवांचा खूपच उपयोग झाला.

सुरुवात सहा केनेल्स (प्रत्येक कुत्र्यासाठी छोट्या खोलीसारखी जागा म्हणजेच केनेल्स) बांधून झाली. कुत्र्यांची संख्या वाढत गेली तशी केनेल्सची संख्याही वाढत गेली. इथे कुत्र्यांना खेळण्यासाठी मोकळी जागा ठेवलेली आहे. वारा, उन, पाऊस या साऱ्यापासून कुत्र्यांचं संरक्षण होईल, त्यांना पुरेसा प्रकाश आणि मोकळी हवा मिळेल या साऱ्याचा विचार ही केनेल्स बांधताना बारकाईने केलेला आहे. पोहण्यासाठी स्विमिंग टँकची व्यवस्था आहे. कुत्र्यांचे पाय घसरु नयेत म्हणून गुळगुळीत फरशीचा वापर टाळलेला आहे. त्याऐवजी साधी खडबडीत फरशी वापरलेली आहे. उन्हाळा तीव्र असताना पंखे अथवा एअर कुलर्स लावून कुत्र्यांसाठी थंडावा तयार केला जातो. पेटसीटर्सचा हा सगळा परिसर मुळातच हिरव्यागार निसर्गाच्या सान्निध्यात आहे. त्यामुळे शहरी गजबजाटापासून आणि प्रदुषणापासून तो मुक्त आहे. कुत्र्यांना स्वच्छंद बागडण्यासाठी ते पूरकच ठरतं. कुत्र्यांसाठी खाणं इथल्याच किचनमध्ये बनवलं जातं. त्यांना सांभाळणारा स्टाफ पेटसीटर्सच्या परिसरातच राहतो. त्यामुळे रात्रीसुद्धा कुत्र्यांची काळजी घेतली जाते. सगळी केनेल्स रोजच्या रोज स्वच्छ केली जातात. इतका सगळा सखोल विचार करुन पेटसीटर्सचं काम सुरु झालेलं असल्यामुळे अल्पावधीतच त्याला प्रसिद्धी मिळाली


आणि ६ कुत्र्यांपासून सुरु झालेला हा व्यवसाय ४४ कुत्र्यांवर जाऊन पोहोचला. सध्या पेटसीटर्समध्ये ४४ केनेल्स आहेत. आतापर्यंत जवळपास ५००० कुत्री पेटसीटर्समध्ये राहून गेलेली आहेत.

सुरुवातीच्या काळात शलाकाताई एकहाती सारं सांभाळत होत्या. पण जसजशी कुत्र्यांची संख्या वाढायला लागली तसतसं स्टाफ ठेवणं आवश्यक व्हायला लागलं. पण या व्यवसायात कर्मचारी मिळणं आणि ते टिकणं हेही सोपं नाही. सुरुवातीला काही कर्मचारी काही दिवसांतच पळून गेले. एकदा तर अगदी दसऱ्याच्या दिवशी सकाळीच सगळेच्या सगळे कर्मचारी गायब झाले. त्यावेळी पेटसीटर्समध्ये २६ कुत्री होती. शलाकाताईंना हे समजताच त्या तिथे काही दिवसांसाठी राहायलाच आल्या. तो काळ त्यांनी निभावून नेला खरा. पण मनोमन विचार यायला लागले आपण हे खरंच दीर्घकाळ करु शकणार आहोत का? कर्मचाऱ्यांशिवाय आपल्याला हा उद्योग शक्य होणार आहे का? का इथून परत फिरायचं? शिवाय सुरुवातीला वाटलं होतं की मोठ्या सुट्ट्यांमध्ये चालणारा हा व्यवसाय सीझनल असेल. पण प्रत्यक्षात बाराही महिने या ना त्या कारणाने लोक कुत्र्याला पेटसीटर्समध्ये सोडून जातात असं लक्षात आलं. त्यामुळे वर्षाचे ३६५ दिवस काम चालूच राहणार हे नक्की.


मनाच्या या गोंधळलेल्या अवस्थेत त्यांच्या कुत्र्यांवरच्या प्रेमाने कौल दिला. काहीही झालं तरी हा व्यवसाय बंद करायचा नाही. नवीन चांगले कर्मचारी मिळेपर्यंत काही दिवस आपल्याला एकटीला सांभाळता येतील इतक्याच कुत्र्यांना प्रवेश द्यायचा. त्यांनी सरळ काही केनेल्स बंद केली. नवीन कर्मचाऱ्यांना घेताना त्यांना खरोखरंच कुत्र्यांबद्दल प्रेम आहे ना हे तपासलं. कामाचे ठराविकच तास नसतील याची स्पष्ट कल्पना दिली. सणावारांना काम जास्त असेल, सुट्ट्या मिळणार नाहीत हे सुरुवातीलाच सांगितलं. कुत्र्यांचं उष्टंखरकटं, शीशू काढणं हे प्रेमाने करावं लागेल याची कल्पना दिली. कामावर ठेवतानाच या गोष्टींची जाणीव दिल्यामुळे आता जे आठ कर्मचारी आहेत ते शलाकाताईंइतकीच कुत्र्यांची प्रेमाने काळजी घेतात. वेळोवेळी शलाकाताई त्यांना प्रशिक्षणही देतात. पेटसीटर्सकडे १०-१२ गावठी कुत्री आहेत. घरात वाढणाऱ्या कुत्र्यांसारखं त्यांना ट्रेनिंग नसतं. नवीन स्टाफला आधी या कुत्र्यांबरोबर काम करावं लागतं. कुत्र्यांना सूचना देताना भाषा महत्त्वाची ठरत नाही तर त्या सूचना देणाऱ्याची बॉडी लँग्वेज कुत्रा ओळखत असतो. ते समजून कुत्र्यांशी व्यवहार करावा लागतो याची जाणीव शलाकाताई स्टाफला देतात.

पेटसीटर्समध्ये सांभाळण्यासाठी कुत्रा घेताना तो कोणत्याही जातीचा (ब्रीड) असला तरी चालतं. वयाच्या साडे चार महिन्यांपासून पुढची कुत्री घेतात.









**शलाकाताईंनी केनेल मॅनेजमेंटचा कोर्स २००८ साली मुंबईला शिरीन मर्चंट यांच्याकडे केला. २०१० साली त्यांनी ट्रेनिंग अँड बीहेवीयर ऑफ डॉग्ज हा कोर्स यूकेच्या जॉन रॉजर्सन यांच्याकडे ऑनलाईन केला तर नंतर त्यांच्याचकडे डॉग अॅग्रेशनसंदर्भातला अभ्यासक्रम पूर्ण केला. शिवाय कुत्र्यांच्या संदर्भातले सतत ऑनलाईन कोर्सेस सुरु असतात. तेही त्या करत असतात. पण यापेक्षा प्रॅक्टिकल नॉलेज जास्त महत्त्वाचं आणि शिकवणारं ठरतं असं त्या म्हणतात.**

त्यापेक्षा लहान कुत्र्यांचं व्हॅक्सीनेशन पूर्ण झालेलं नसतं. त्यामुळे त्यांची प्रतिकारशक्ती अगदी कमी असते. या छोट्या पिलांमुळे इतर कुत्र्यांना आणि इतर कुत्र्यांमुळे पिलांना आजार होण्याची शक्यता असते. कुत्र्याची आणि ते ज्या कुटुंबातून आलं आहे त्यांची प्राथमिक माहिती घेतली जाते. कुत्र्याच्या खाण्यापिण्याच्या, भुंकण्याच्या, स्पर्शाच्या सवयी यांच्याबद्दल समजून घेतलं जातं. सुरुवातीला एका फॉर्मवर लिखित स्वरुपात ही माहिती घेतली जायची. पण काही वेळा लोक त्यावर अर्धवट आणि अपुरी माहिती देतात असं लक्षात आलं. त्या माहितीच्या आधारे पेटसीटर्सने आपल्या कुत्र्याला सांभाळायला नकार दिला तर? अशी भीती अपुरी माहिती देण्यामागे असते. पण त्याचा त्रास नंतर पेटसीटर्सच्या टीमला आणि त्या कुत्र्यालाही होतो. म्हणून आता कुटुंबातील सदस्यांशी अनौपचारिक बोलण्यातून ही माहिती काढली जाते. त्यानंतर कुत्र्यांना पेटसीटर्सची सवय व्हावी म्हणून प्रत्यक्ष तिथे सोडून देण्याआधी कुत्र्याच्या आणि त्या कुटुंबाच्या पेटसीटर्सला एक दोन भेटी होतात. दोन्हीकडच्या सदस्यांना एकमेकांबद्दल खात्री पटली की मग बुकिंग कन्फर्म होतात. अर्थात त्यासाठी पालकांना कुत्र्याचं व्हेटर्नरी सर्टिफिकेट पेटसीटर्सकडे द्यावं लागतं. कुत्र्याचा फिटनेस त्यातून बघितला जातो. त्याला कशाची अॅलर्जी आहे का हे बघितलेलं असतं. त्याचं व्हॅक्सिनेशन अपडेट आहे ना हे बघितलं जातं. इतर कुत्र्यांना त्यामुळे त्रास अथवा रोगाची लागण होऊ नये हा त्यामागचा उद्देश असतो. यानंतर पालकांना कुत्र्याबरोबर काय द्यायचं याची लिस्ट दिली जाते. सर्वसाधारणपणे त्यात कुत्र्याचं बेडिंग आणि औषधं एवढंच असतं. जेवण पेटसीटर्सकडूनच दिलं जातं. पण एखाद्या कुत्र्याला

विशेष काही खाण्याची सवय असेल तर तो पदार्थ पालकांकडून मागवला जातो. कुत्र्याला सांभाळण्याचे दर दिवसाप्रमाणे ठरतात. ते साधारणपणे चोवीस तासांसाठी ८५० ते १२५० या दरम्यान आहेत. त्याशिवाय आठवड्यासाठी, महिन्यासाठी आणि त्याहून जास्त कालावधीसाठी कुत्र्याला ठेवायचं असेल तर दरांची वेगवेगळी पॅकेजेस उपलब्ध आहेत.

यानंतर प्रत्येक कुत्र्याचा दिवसभराचा ॲक्टिव्हिटी चार्ट बनवला जातो. त्यात त्याच्या खाण्यापिण्याच्या वेळा, खायला काय आणि किती द्यायचं, औषधांच्या वेळा, फिरण्याच्या वेळा, शीशूच्या वेळा वगैरे गोष्टी तपशीलात लिहिल्या जातात. प्रत्येक कुत्र्याची वैयक्तिक गरज बघितली जाते. त्याला कुठला व्यायामप्रकार चालतो, कुठल्या वेळेला चालतो, हा कुत्रा दुसऱ्या कुत्र्याबरोबर खेळतो का, का एकट्याने खेळतो? त्याची स्वच्छता म्हणजे त्याची नखं, कान, दात साफ करणे या सगळ्याचा तक्ता बनवला जातो. पेटसीटर्सची टीम तो अमलात आणते. हे सगळं निश्चित करत असताना आपल्याला कष्ट किती पडतील यापेक्षा कुत्र्यासाठी ते किती सुखाचं आणि सोयीचं असेल याकडे विशेष लक्ष दिलं जातं.


या सगळ्या प्रवासात शलाकाताईंकडे कुत्र्यांचे आणि त्यांना सांभाळणाऱ्या कुटुंबातील सदस्यांचे असंख्य अनुभव जमा आहेत. काही कुत्री पटकन रुळतात तर काहींना २-३ दिवस लागतात. सहसा एकदा येऊन गेलेला कुत्रा पुढच्या वेळेला पटकन रुळतो. नवीन कुत्र्यांना वेळ लागू शकतो. त्यासाठी त्याच्या सवयी समजून घेऊन त्याला कम्फर्टेबल करण्यावर भर दिला जातो. कुत्री त्यांच्या हालचालींवरुन (बॉडी लँग्वेज) सांगत असतात असं शलाकाताई म्हणतात. अनुभवावरुन त्यांची ही भाषा समजायला लागते. काही पालक मात्र कुत्र्यांच्या अजब सवयी सांगतात ज्या पेटसीटर्सच्या टीमला पाळणं अवघड असतं. उदाहरणार्थ, आमच्या कुत्र्याला रोज संध्याकाळी शुभंकरोती ऐकून मगच जेवायची सवय आहे, त्याला तूप लावलेलीच पोळी जेवणात लागते - कोरडी पोळी खात नाही, त्याचं जेवण झालं की तोंड पुसावं लागतं, त्याला अमूक एक भांडंच जेवणासाठी लागतं.. वगैरे. यातल्या ज्या सवयी सहजपणे पाळणं शक्य असतं त्या



**लोक अनेक कारणांसाठी कुत्री पेटसीटर्सकडे सांभाळायला देत असतात. वरवर पाहता फक्त परगावी अथवा परदेशात जाण्याचं कारण दिसतं. घरात रंगकाम चालू असताना पेटसीटर्समध्ये कुत्रा सोडणं सोयीचं होतं. दिवाळीच्या दिवसांत फटाक्यांच्या आवाजाने कुत्रा भेदरण्याची शक्यता असते. तेव्हाही पेटसीटर्स कुत्र्याची जबाबदारी घेतं आणि पालकांना दिवाळीचा आनंद लुटता येतो. घरी छोटं बाळ आणि बाळंतीण असेल, गंभीर आजाराचा रुग्ण असेल, घरातल्या कोणाला अचानक अपघात झाला तर, लग्नासारखा एखादा मोठा समारंभ असेल तर कुत्र्याकडे लक्ष देणं अवघड होतं. अशा वेळी पेटसीटर्सची मदत घेणं अनेक दृष्टीने सोयीचं ठरतं. अशा वेळी कुत्र्याला सोडताना काही पालकांना थोडंसं अपराधी वाटतं. पण शलाकाताई त्यांना निश्चिंत करतात. कुत्र्याची आबाळ होणार नाही आणि तुम्हाला तुमच्या घरातील प्रसंगाकडे पूर्ण लक्ष देता येईल यासाठी मदत घेताय असं समजा असं सांगून त्यांच्या मनावरचा ताण त्या हलका करतात. शिवाय कितीही दिवस कुत्रा पेटसीटर्सकडे राहिला तरी मूळ घर आणि त्यातली माणसं कधीच विसरत नाही हेही लक्षात आणून देतात.**







पाळल्याही जातात. पण ज्या शक्य नसतील त्याची आगावू कल्पना पालकांना दिली जाते. खरंतर कुत्री बदलांना लवकर ॲडजस्ट होतात असं शलाकाताईंचा अनुभव सांगतो. कारण काही वेळा कुत्र्याच्या सवयीपेक्षा पालकांनी केलेले लाड त्यात जास्त असतात. पण बऱ्याचदा पालकांना ते पटत नाही. मग कुत्र्याच्या बदललेल्या सवयीचे व्हिडिओ शलाकाताई पालकांना पाठवतात. इतक्या वर्षांत दोन कुत्र्यांचा अपवाद वगळला तर पेटसीटर्समध्ये कुत्रा रुळला नाही असं झालं नाही.

काही घरांमध्ये हौसेने कुत्रा पाळला जातो. सुरुवातीचे काही दिवस त्याचं सगळं प्रेमाने, कौतुकाने केलंही जातं. पण एकदा ही नव्याची नवलाई सरली की कुत्र्याची आबाळ व्हायला सुरुवात होते. त्या कुत्र्याला नीट सवयी लावल्या जात नाहीत, त्याचं खाणं नीट सांभाळलं जात नाही. शलाकाताईंकडे असाच एक कुत्रा एकदा आला. सुरुवातीच्या औपचारिकता पूर्ण झाल्यानंतर पेटसीटर्सच्या सदस्याने बघितलं तर त्याच्या केसांमध्ये असंख्य गोचीडा झालेल्या होत्या. त्यामुळे तो कुत्राही चिडचिडा झाला होता. त्याच्या पेटसीटर्सच्या वास्तव्यात सगळ्या गोचीडा काढून त्याला स्वच्छ करण्यात आलं. त्याला परत घेऊन जायला आलेल्या पालकांशी शलाकाताई याबद्दल सविस्तर बोलल्या. पुढच्या महिन्यात तो कुत्रा पुन्हा आला आणि आला ते पुन्हा तशाच गोचीडा अंगावर घेऊन. याहीवेळी पेटसीटर्सने त्या साफ केल्या. पण परत देताना पेटसीटर्स या कामासाठी नाही हे पालकांना स्पष्ट सांगण्याची वेळ आली. कुत्र्याची प्राथमिक माहिती घेत असताना काही पालकांना त्याचे व्हेटर्नरी डॉक्टर कोण हेच माहिती नसतं. आपला कुत्रा कशामुळे चिडचिड करतो, भुंकतो हे समजून घ्यायचा प्रयत्न केला जात नाही. अशा ठिकाणी कुत्र्यांची आबाळ होते.

काही कुत्री शलाकाताईंकडे सलग अनेक वर्षं येत आहेत. त्यांच्या पालकांचा पेटसीटर्सवर पूर्ण विश्वास आहे. एक-दोन आजारी असलेले कुत्री एकदा पेटसीटर्समध्ये आली. त्यांचा शेवट पेटसीटर्समध्ये झाला. पण ती त्यांच्याकडे येतानाच काहीशी आजारी असल्यामुळे, वयस्कर झालेली

असल्यामुळे (कुत्र्यांचं आयुष्य साधारणपणे १२-१४ वर्षांचं असतं.) त्यांच्या पालकांनी पेटसीटर्सला जबाबदार तर धरलं नाहीच पण उलट त्या त्या प्रसंगांमध्ये शलाकाताईंना पूर्ण निर्णयस्वातंत्र्य दिलं. पेटसीटर्समध्ये त्यांच्या स्मरणार्थ झाडं लावण्यात आली आहेत. वारंवार येणाऱ्या कुत्र्यांचा लळा लागलेला असतो. त्यामुळे असे प्रसंग पेटसीटर्सच्या टीमला भावूक करतात.

या क्षेत्रात उद्योगाच्या संधी भरपूरच आहेत. एकट्या पुण्याचा विचार केला तरी पुण्यात जितकी कुत्री आहेत त्यांच्या तुलनेत केनेल्सचं प्रमाण खूपच कमी आहे. त्यामुळे या उद्योगाचा विचार अनेकजण करु शकतात. मात्र त्यासाठी अनिवार्य अट ही कुत्र्यांबद्दलच्या असलेल्या खोलवर प्रेमाची आणि जिव्हाळ्याची आहे. केवळ पैसे मिळतील म्हणून घाईघाईने निर्णय घेऊन चालत नाही. त्यानंतर मुख्य गोष्ट जागा. किमान दहा ते बारा कुत्र्यांपासून हा उद्योग सुरु केला तर ब्रेक इव्हन पॉईंट लवकर येतो. त्यादृष्टीने किमान अर्धा एकर जमीन आवश्यक आहे. ज्यावर प्रत्येक कुत्र्यासाठी स्वतंत्र छोट्या खोलीसारखी व्यवस्था, त्यांना खेळण्यासाठी मोकळी जागा, किचन, स्टाफला राहण्यासाठी जागा आणि छोटं ऑफिस बांधता येईल. या कामात शारीरिक आणि मानसिक ताण बराच आहे. त्याला रोजच्या रोज सामोरं जाण्यासाठी स्वत: शारीरिक आणि मानसिक दृष्टीने तंदुरुस्त असलं पाहिजे. प्रत्यक्ष उद्योग सुरु करण्यापूर्वी एखाद्या संस्थेत किंवा व्हेटर्नरी डॉक्टरकडे कुत्र्यांबरोबर काही महिने कामाचा अनुभव घेतला तर जास्त सोयीचं ठरतं. पेटसीटर्सने यासाठी इंटर्नशीपची व्यवस्था केलेली आहे ही विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे.

ज्यांना जागेची गुंतवणूक करणं शक्य नाही असे लोक आपल्या राहत्या घरी पुरेशी जागा असेल तर तिथेही छोट्या प्रमाणात पेटसिटिंग सुरु करु शकतात. मात्र त्यावर मर्यादा येतात. ज्या कुत्र्यांना इतर कुत्र्यांबरोबर राहायला आवडत नाही, अगदी स्वतंत्र व्यवस्थाच हवी असते अशा कुत्र्यांना ठेऊन घेता येत नाही. हा उद्योग घरातून करताना कुत्र्यांच्या आणि घरातल्या सदस्यांच्या सुरक्षेची काळजी खूप जास्त घ्यावी लागते. जास्त काळासाठी कुत्री घेता येत नाहीत. अशा मर्यादा येत असल्या तरी व्यवसायाचा अंदाज येण्यासाठी सुरुवात घरातून करणं सोयीचंही ठरतं. हा व्यवसाय आपण खरंच करु शकणार आहोत ना याचा अंदाज घेता येतो आणि त्यानुसार जागेची गुंतवणूक करता येते. शॉप ॲक्ट लायसन्स या व्यवसायासाठी आवश्यक आहे. सेवा क्षेत्रात हा व्यवसाय मोडत असल्यामुळे सेवा क्षेत्राला लागू होणारे सारे नियम, कायदे यालाही लागू होतात. जागेची गुंतवणूक केलेली असेल तर ३ ते ५ वर्षांत ब्रेक इव्हन पॉईंट येतो. शलाकाताईंच्या बाबतीत जागेचा प्रश्न नसल्यामुळे ब्रेक इव्हन लवकर आला.

कुत्र्यांच्या सतत सहवासात राहिल्याने काही आजार होतात असा एक समज आहे. शलाकाताई तसं अजिबात मानत नाहीत. इतक्या वर्षात कुत्र्यांमुळे त्यांना कुठलाही आजार झालेला नाही. मूळात तुम्हाला काही आजार असेल तर कुत्र्यांच्या सहवासात तो वाढण्याची शक्यता असते असं त्या म्हणतात. त्यांना पाच वेळा कुत्री चावलेली आहेत. पण त्याचा दोष त्या कुत्र्यांना देत नाहीत. तो कुत्रा मला काय सांगत आहे हे लक्षात आलं नाही म्हणून हे झालं असं त्या सांगतात. शलाकाताईंचं श्वानप्रेम किती गाढ आहे हेच यातून सिद्ध होतं. त्यांच्या पेटसीटर्सच्या व्यवसायवाढीचं गुपीतही हेच आहे असं म्हणायला हरकत नाही. ❖

**संपर्क :**
९४२३००९६४८ / ९८८१०७६६७७
www.petsitters.co.in